# CRITERIA VII

**7.1.9: Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

.

# आझाद महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



औसा : येथील हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या आझाद महाविद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी हिंदुस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.संजय कुलकर्णी यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले तर स्काऊट ध्वजाचे ध्वजारोहन राष्ट्रवादी कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय कोळपे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी अजीम ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य निजाम शेख,आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ई.यु.मासूमदार, प्राध्यापक,शिक्षक,कर्मचारी सामाजिक अंतर राखून उपस्थित होते.



# आझाद महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

औसा, दि. ६ : येथील आझाद महाविद्यालयात ५ सप्टेंबर भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांची जयंती शिक्षक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ.ई.यू.मासूमदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तद्नंतर प्राचार्यांनी शिक्षक दिनानिमित्त सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय चव्हाण, प्रा. गोविंद टिंगरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.



**Carrier Katta- Initiative by Government of Maharashtra**

# मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य



औसा, दि. २५ : मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असून भारतीय राज्यघटनेने भारतीयांना मोठ्या उदात्त हेतूने १८ वर्षांवरील नागरिकांना मतदानाचा अधिकार दिला आहे तो त्यांनी बजावलाच पाहिजे असे प्रतिपादन प्रा. डॉ.शाम लेंडवे यांनी आझाद महाविद्यालय औसा येथे राष्ट्रीय मतदार दिवस निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून बोलताना केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ई. यू. मासुमदार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा डॉ. शाम लेंडवे ( राज्यशास्त्र विभाग प्रमुख शिवाजी महा.रेणापूर)हे होते.

यापुढे बोलताना ते म्हणाले की, देशातील प्रत्येक नागरिकाने जात, धर्म, पंथ याच्यापुढेही जाऊन मतदान केले पाहिजे हे सांगताना एक मतामध्ये देश घडविण्याचे सामर्थ्य असून बाहेरील काही देशात मतदान सक्तीचे आहे तसेच आपल्या देशात मतदान सक्तीचे केले जावे असे मत व्यक्त केले,तसेच अन्य अनेक बाबीवर भाष्य केले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य मासूमदार म्हणाले की, मतदान हा आपला घटनात्मक अधिकार असून तो प्रत्येकाने बजावलाच पाहिजे, मतदारांनी जागरूक राहून मतदान केले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा डॉ. डी. डी. क्षीरसागर यांनी करताना कार्यक्रम आयोजनाचा उद्देश सांगून मतदार दिवसाची सुरुवात कधी झाली हे सांगितले तसेच राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदारासाठींची प्रतिज्ञा दिली.

या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य टी. ए जहागीरदार, आयक्यूएसी समन्वयक प्रा डॉ. निसार सय्यद, नॅकचे प्रा. डॉ. मेहराज बरोटे, तंत्रज्ञ म्हणून प्रा. ओवेज झरगर,महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थी उपस्थित होते.

# आझाद महाविद्यालयात संविधान दिन साजरा

औसा : येथील आझाद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभागाच्यावतीने २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ई.यु. मासूमदार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री कुमारस्वामी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.दयानंद पटवारी हे होते. सर्वप्रथम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.प्रा.डॉ.पटवारी यांनी भारतीय राज्यघटना जगात सर्वश्रेष्ठ असून राज्यघटनेने नागरिकांना समान अधिकार दिले असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्यांनी राज्यघटनेतील काही कलमाविषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.डी.डी क्षीरसागर यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.डॉ. संजय चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




ाधीश क. स्तर
न्यायालयात